**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2018 = 6.371, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, MAY-JUNE, 2019, VOL- 6/51*

# ख्रिस्ती धर्मातील जीवनशैली:-एक तुलनात्मक अभ्यास

**वळवी विश्वास गोरखनाथ**

***संशोधक विध्यार्थी सामाजिक शास्त्रे प्रशाळा, इतिहास विभाग, कबचौउमवि, जळगाव,***

***इमेल***-*vishwasvalvi1986@gmail.com*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना:-**

**जे आर मिलर याने आपल्या स्वतःच्या गेथशेमानेबागेत प्रार्थना कशी करावी या लेखात म्हणतात "मग अत्यंत विव्हळ होऊन-त्याने अधिक आग्रहाने प्रार्थना केली!"आपल्या तारणकर्त्याच्या गेथशेमाने बागेतील अनूभवाची हि नोंद आहे. हे शास्त्र-वचन एका उज्ज्वल दिव्याप्रमाणे असून बागेतील जैतून वृक्षांमध्ये आपल्या दु:खाच्या वेळी आपल्याला सांत्वन देण्याचा मार्ग दाखवीण्यासाठी चमकत आहे.उद्धारकर्त्याने त्या रात्री जे दु:ख भोगले ते त्यापूर्वी कधीही भोगण्यात आले नव्हते परंतु त्याला त्याच्या प्रार्थनेत सांत्वन मिळाले.त्याने प्रार्थना केल्यामूळे त्याचे दुःख कमी झाले,शेवटी त्या दुखातील कटूपणा संपला आणि त्याची जागा मधुर, धन्यवादित शांतीने घेतली.'प्रार्थनेचे द्वार' हे सांत्वन आहे. खऱ्या सांत्वनासाठी आणि मदतीसाठी इतर कोणतीही जागा नाही. आपल्या प्रभुच्या गेथशेमानेच्या वेदनातून आपण आपल्या स्वतःच्या गेथशेमाने बागेत प्रार्थना कशी करावी हे शिकतो.कडू प्याला काढून टाकावा या केलेल्या विनंतीबद्दल, किंवा आग्रहाने केलेल्या प्रार्थनेसाठी देव कधीही आम्हाला दोष लावत नाही; परंतू आपण नेहमी त्याच्या इच्छेला अधीन होण्याकरिता प्रार्थना करावी. जेव्हा आपण प्रामाणिकपणे प्रार्थना करतो,"माझी इच्छा नाही, तर तुझी इच्छा पूर्ण होवो.तेव्हा आपल्याला सांत्वन मिळते आणि शांती लाभते.ख्रिस्ताने क्रुसावर आपल्यासाठी दुखे भोगली.सुवेळी-अवेळी आपल्यांना ख्रिस्तासाठी तयार असले पाहिजे विश्वासा सांब संबंधी असलेला इब्रीकराचा एकरावा अध्याय सांगतो कितीएक लोकांनी स्वता:हून मृत्यू स्वीकारली कि देवाचे राज्य प्राप्त व्हावे.तसेच जे सी रायल लिहितो**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

''ख्रिस्ताने दु:खे भोगली आहेत,तर तुम्हीदेखील ती भोगाल!जेव्हां आपली विटबंना (उपहास) व थट्टा केली जाते आणि आपल्याविरुद्ध खोटे अहवाल सादर केले जातात; तेव्हां आपल्याला ती सहन करावी लागतात म्हणून कधीही आश्चर्य मानू नका कारण आपण तर ख्रिस्ताचे आहोत.आणि म्हणून शिष्य हा त्याच्या गुरू पेक्षा,चाकर हा त्याच्या धन्या पेक्षा श्रेष्ठ नाही.जर आपल्या तारणाऱ्यावर खोटेपणा व अपमान यांचा ढिग रचण्यात आला होता, तर मग त्याच्या लोकांवर त्याचप्रकारची शस्त्रे वांरवार वापरली जात असतील,तर त्यात आम्ही आश्चर्य मानू नये. कारण सैतानाची हि एक मोठी चाल आहे.जीच्याव्दारे तो देवभक्तांच्या व्यक्तीमत्वास काळींबा लावत असतो आणी त्यांना अपमानित करीत असतो.

**१) तुमचे रक्त बायबल-मय आहे का:-**

**"मी देवाचे मन वाचू शकत नाही, परंतु मी त्याचे वचन वाचू शकतो."**

**आर. सि. स्प्रोल**

माझे मी म्हणून काही अस्तित्व नाही,मी माझा नाही कारण ख्रिस्ताने माझी पापाची मजुरी चुकती केलेली आहे.आज पासून मी फक्त ख्रिस्ताचा आणि त्याच्या राज्याच्या प्रतीनिधि आहे.आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली मला माझे उर्वरित आयुष्य जगायचे आहे.माझ्याकडे आता शास्त्र आणि पवित्र आत्मा आहे आणि तेच माझे खरे दिशादर्शक आहे.जॉन मॅकआर्थर म्हणतात "तुमच्या विवेकभावाला बायबलच्या ज्ञानाने शिक्षित करा.जर तुमचा विवेकभाव सहज घायाळ होत असेल तर त्याचा अनादर करू नका.आशा रीतीने खात्री करून घेण्याच्या प्रक्रियेची पायमल्ली करण्याच्या दिशेने तुम्ही स्वतःला प्रशिक्षित करता." स्पष्टच तुम्हचा आत्मिक जीवनाला जर पवित्र शास्त्राची जोड नसेल तर खऱ्या अर्थाने तुम्ही ख्रिस्ती भिकारी आहात,आणि तुम्हाला स्वतःला ख्रिस्ताची गरज आहे,म्हणून दुसऱ्याचा कटोऱ्यात ख्रिस्त टाकायचा प्रयत्न करू नका,कारण तुम्हचा स्वतःचा कटोरा ख्रिस्ताचा पवित्र रक्ताने रिक्त आहे.आणि हा रिक्त कटोरा पवित्र् वचनाने आणि ख्रिस्ताचा कृपेनेचे भरणे शक्य आहे.दुसरा कोणताच मार्ग नाही.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

चार्ल्स स्पर्जन म्हणतात ''ही एवढी धन्यवादीत गोष्ट आहे की तुम्ही बायबलच्या आत्म्याचेच इतके सेवन करता की अखेर तुम्ही वचनाचीच भाषा बोलायला लागता आणि तुमच्या आत्म्याला देवाच्या स्वाद येतो.त्यामुळे तुमचे रक्त बायबल-मय होऊन जाते आणि बायबल अकर्च तुमच्यातून वाहू लागते." तुमचे रक्त बायबल-मय आहे का? देवाचा व्यक्ती म्हणून माझे रक्त हे बायबल मय आहे का,माझे रक्त लाल आहे हे मला माहित आहे,पण या रक्तात जर पवित्र वचनाच्या धारा वाहत नसेल तर हे रक्त काय कामाचे,ख्रिस्ताने त्याचे पवित्र रक्त सांडले यामुळे की आमचे रक्त शुद्ध व्हावे,आणि हे देवाचा पवित्र वचनानेच होऊ शकते.योहान-15:2 हे वचन सांगते मी त्या वचनाने जे तुने मला दिले आहे मी शुद्ध झालो.या दिवसात जो देवाचा वचनाचे सेवन करेल तो देवाचीच भाषा बोलले कारण अन्यभाषा स्वतःची तर भविष्यवाणी आणि देवाचे वचन मंडळींची उन्नती करते,ही उन्नती तुम्ही वचनाचे किती सेवन करता यावर अवलंबून असते.आणि हे सेवन करत असताना आपल्या आत्म्याला देवाचा वचनाचा खरा स्वाद प्राप्त होतो.हे वचनाचे सेवन करत असताना तुम्ही "धर्माचे पांघरून होणार कारण धार्मीकतेने देव तुम्हाला भरून काढेल.आणि तुमची पवित्र नितीमत्ता हीच तुम्हचा खरा झगा आणि उद्धाराची शिरोभूषण होईल.तुम्ही आंधळ्याना दृष्टी देणार,तुम्ही खऱ्या अर्थाने जे लाचार आहे त्यांचे मित्र होणार,अपरिचित जे तुम्हाला ओळखत नाही ते ख्रिस्ताचा नावाने तुमची शरण घेतील,सैतानाच्या तावडीतून अनेक लोकांना तुम्ही सोडवून देवाचा राज्यात आणाल.(इयोब-29:14-17) एवढी धन्यवादीता फक्त देवाचा पवित्र वचनाने येईल म्हणून यिर्मया सारखे देवाचे वचन खाऊन टाका आणि आपले रक्त बायबल मय करून देवाचा राज्यात नेहमीसाठी वाहत राहा.

२) ख्रिस्ताची जीवनशैली माझ्यात वाहतेय का?

"आपले ख्रिस्तीजीवन खरोखरच शुद्ध आणि प्रभावी व्हावे असे आपणास वाटत असेल; *तर परमेश्वरासोबत आपला हिशोब स्पष्ट करावा."

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

ए. डब्ल्यू. पिंक.निवड आणि नितीमत्व विषयीचा सिद्धांत समजावून सांगतांना लिहितात "मला कसे कळेल की,मी निवडलेला आहे?"सर्वप्रथम, देवाच्या वचनाद्वारे दैवी सामर्थ्य आत्म्याला प्राप्त होते, जेणेकरून माझ्या स्वतः ची आत्मसंतूष्टी विखुरली आहे आणि स्व-धार्मिकता त्यागली आहे.दुसरे, पवित्र आत्मा मला माझ्या शोकमय, दोषी आणि हरविलेल्या स्थितीबद्दल जाणीव करून देतो.तिसरे, माझ्या अत्यंत निराशाजनक परिस्थितीची दूर करण्यासाठी मला ख्रिस्ताची योग्यता आणि पूरकता प्रकट केल्याने आणि देवाकडून दिलेला विश्वास मला कारणीभूत ठरवतो की, तोच माझी एकमेव आशा आहे जीला मी धरून ठेवावे आणि त्याच्याठायी विश्रांती घ्यावी.चौथे, माझ्यातील नव्या स्वभावाचे चिन्ह जे देवाबद्दलचे प्रेम; आध्यात्मिक गोष्टींसाठी भूक; पवित्रतेची उत्कंठा; ख्रिस्ताशी समनुरूपता असणे.पाचवे, नवीन स्वभाव जो जून्या स्वभावाचा प्रतिकार करतो; तो मला पापाचा तिरस्कार करण्यास आणि त्या कारणास्तव माझ्या स्वतःची घृणा करण्यास भाग पाडतो.सहावे, देवाच्या वचनाने जे काही धिक्कारले आहे त्या सर्व गोष्टीं नकारल्याने, आणि प्रामाणिकपणे पश्चाताप केल्याने, आणि नम्रपणे प्रत्येक अपराध कबूल केल्याने.तोपर्यंत अपयश हे आपल्या खात्रीवर निश्चयपूर्वक काळेभोर ढग आणेल जो आत्म्याला त्याची साक्ष न सांगण्याचे कारण होईल.सातवे, सर्व ख्रिस्ती कृपादानांसाठी परिश्रम घेऊन त्यांची वाढ करणे आणि सर्व परिश्रम त्या मार्गी लावणे, यासाठी की,निवडी संदर्भाचे ज्ञान वाढले जाईल.

३) ख्रिस्ताची जीवनशैली पवित्र शास्त्राचा अधिकारातून वाहते:-

"पवित्र बायबलच तुमच्यासाठी (विश्वासीसाठी) अंतिम अधिकार असून बायबलची घोषणा करणारी व्यक्ती (पाळक) नाही याची खात्री करून घ्या." -स्टीव्हन ए क्रॅलोफ-

जॉन स्टॅाट म्हणतात''पवित्र शास्त्राच्या अधिकारावर विश्वास ठेवणे व त्यास अधीन होणे हे ख्रिस्ताचे दैवत्वाचे प्रभुत्व स्विकारण्याचा आवश्यक परिणाम आहे.''.कोहेलर म्हणतात''परमेश्वराचा अधिकार नाकारणे म्हणजे परमेश्वराच्या अधिकाराविरुद्ध बंड करणे.अशा कृतीस शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही.ट्युरेटीन रीफॅार्मड स्कॅालर म्हणतात "नविन करार हा ख्रिस्ताची शेवटची इच्छा व

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**शेवटचा करार आहे.जर मृत व्यक्तीच्या इच्छापत्रातून काहीही बदलू शकत नाही तर ख्रिस्ताच्या अंतिम करारात व इच्छेत कोणीही भर घालू नये.**(गलती. ३:१५ ; प्रगटीकरण२२:१८-१९.) **तसेच** .LBC **आपल्या लेखात बायबल संबंधी लिहिते ''तारण देणाऱ्या ज्ञानासाठी विश्वासासाठी व आज्ञापालनासाठी पवित्र शास्त्र हे एकमात्र पुरेसे, निश्चित व कधी न चुकणारे प्रमाण आहे''देवाचे वचन हे ईश्वरप्रेरीत,अचूक व सिध्द आहे.म्हणुन ते अधिकृत आहे. देवाने हे अधिकारवाणीने दिलेले आहे,जेव्हा शास्त्र बोलते तेव्हा देव बोलतो,देवाने शास्त्रामध्ये चेतावन्या व आज्ञा आम्हाकरिता दिलेल्या आहेत त्या सार्वभौम अधिकाराने दिलेले आहेत,बायबलचा अधिकार मानवी ज्ञानापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे,बायबलचे ज्ञान मानवी तर्कापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे,मानवी तर्क-वितर्काने तारण होत नाही .यशया १:१८,.बायबल अधिकार विज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे . मानवाची व विश्वासाची निर्मिती आणि सार्वकालिकते बद्दल केवळ पवित्र शास्त्र शिकविते,सायन्स शिकवित नाही.नीतीवचन.९:१०,बायबलचा अधिकार मंडळीच्या वडिलापेक्षा** (**मंडळींचे पिता**) **श्रेष्ठ आहे,बायबलचा अधिकार मंडळीच्या सभासदांवर अधिकृत आहे; मंडळया चुकाविरहित व पापविरहित नाहि पण देवाचे वचन चुकाविरहित वा पापविरहित आहे.बायबलचे अधिकार मंडळीच्या मतांगिकार ,विधी ,आचार ,विचार ,संस्कार यापेक्षाहि श्रेष्ठ आहे,.बायबलचे अधिकार हे मानवी अनुभवांपेक्षाही श्रेष्ठ आहे. योहान १:१८** (**उदा. मी देवाला पाहिले**).**बायबलचे अधिकार हे मानवी भावनांपेक्षा श्रेष्ठ आहे.उदा. मला असे वाटले , देव बोलला.बायबलचे अधिकार आपल्या साक्षेपेक्षा श्रेष्ठ आहे.देवाच्या वचनाचा अधिकार म्हणजे शास्त्रातील प्रत्येक वाक्याच्यामागे,प्रत्येक संदर्भामागे ,प्रत्येक सिद्धान्तामागे,प्रत्येक आज्ञेच्यामागे,प्रत्येक अभिवचानामागे देव ठामपणे त्याचा अधिकाराने उभा आहे.**

**४)** **ख्रिस्ताची जीवनशैली देवाचा कृपेनेच जगता येते:-**

**ख्रिस्ती त्यांच्या स्वतःमध्ये इतर माणसांपेक्षा ज्ञानी नाहीत.जे त्यांच्याकडे आहे ते कृपेने आहे."**

**-कॉर्णेलीयस व्हॅन टिल-**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

देवाच्या कृपेशिवाय माझे जीवन शून्य आहे.जो ख्रिस्ती व्यक्ती असे म्हणतो मी देवाचा कृपेशिवाय माझे जीवन-यापन करतो.तो खोटा ख्रिस्त आहे.कर्मावर विश्वास ठेवणारे आणि चालणारे ख्रिस्ताचा कृपेला तुच्छ जाणतात. जॉन न्यूटन याने आपल्या "अदभूत कृपा"या कवितेतेत देवाची कृपा किती महत्वाची आहे याचे वर्णन देतो.जॉन न्यूटन विषयी म्हणतात की,तो शिव्या देणे व अपशब्द बोलण्यात एवढा तरबेज होता की, दोन तास अशा प्रकारचे दूरभाषण करतांना एकही शब्द तो पुन्हा वापरत नसे,जेव्हा ऐका सागरी वादळात तो आता मरणारच होता त्या क्षणी तो देवाकडे वळला व वाचला,आणि त्याने देवाची अदभूत कृपेचे हैं जगप्रसिध्द गीत लिहून काढले,

"अदभूत कृपा, किती मधुर नाद
मजा भ्रष्टा तारिले.

हरवलेला मी,आता सापडलो
गेले अंधत्व,पाहतो.

कृपेनेच शिकवले या ह्रदयाला भयं
कृपेनेच भयं दूरही केले.
मोल्यवान किती ती कृपाही भासली
विश्वासण्याच्या क्षणी हो मला.

संकटे,परिश्रम, अमिषामधून
मी आलो येथवरी
कृपेनेच आणिले,मज येथवरी
कृपाच नेईल घरी.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तेथे असू आपण,हजारो वर्षे**

**प्रकाशात सूर्यासमान**

**गौरव देवाचे गातच राहू या**

**आरंभिल्या क्षणापासून."**

**"खरंच देवाची कृपाच तुम्हाला त्याचा राज्यात घेऊन जाईल,कारण आमची सर्व धर्मकृत्ये घाणेरड्या वस्त्रासारखी आहे जीचे मूल्य नगण्य आहे देवाची कृपा सर्वोतपरी आहे.**

**५) शुद्ध अंतःकरण खऱ्या ख्रिस्ती व्यक्तीचे चरित्र प्रदर्शित करतो:-**

**"तुम्हच्या चांगल्या कार्यामागील अंतःकरण शुद्ध असायला हवे,नाहीतर तुम्ही अशुद्द जीवनाचे वाटेकरी व्हाल."**

**आजच्या प्रितीचे रुप म्हणजे;काही मंडळ्या आणि पाळक स्व:ताचा अहंकाराची/साधनांची परिपूर्ती प्रितीचा माद्यमातून करून घेतात"प्रिती म्हणजे कुणाला भौतिक गोष्टीचे सहाय्य करून त्याचाबद्दल प्रेम व्यक्त करने,आज काही मंडळ्या हेच करत आहे,पण खरी प्रितीचे तीन तत्व आहे जे जॉन मॅकाआर्थर यांनी मांडलेले आहे,आणि ते भौतिक आणि चांगल्या कामाचा विरुद्ध आहे जे आज काही मंडळींचे लोक दाखविण्याचा प्रयत्न करतात.**

**१) शुद्धअंतःकरण:-**

**"स्तोत्रकर्ता विचारतो,"परमेश्वराचा गिरीवर कोण चढेल? त्याचा पवित्र स्थानात कोण उभा राहील?(स्तोत्र 24:3).नंतर तोच या प्रश्नाचे उत्तर देतो,ज्याचे हात स्वछ आहेत आणि मन शुद्ध आहे(स्तोत्र 51:10) देव इस्राएलवर शुद्ध मनाच्या लोकांवर, खरोखर कृपा करणारा आहे, नव्या जन्माचे स्नान, व शिकवणीनुसार मनापासून वागणूक, करणारे हृदय,शुद्ध हृदय होय."**

2)**चांगला सद्सद विवेक:-**

Agathes (**चांगले**) **म्हणजे परिपूर्ण**, **सुखदायी**, **समाधानकारक आणि चांगलेपणाची भावना**,**सद्सदविवेक ही मनुष्यामध्ये देवाने निर्मिलेली स्व**:**न्यायाची व्यवस्था होय**,**त्याद्वारे मनुष्याचा सदाचाराची साक्ष पटते किंवा त्यामधून मनुष्याला दोष लावला जातो**...**ज्याचे हृदय व मन शुद्ध असते त्यांना त्याचा सद्सदविवेक दोषी ठरवत नाही व समाधान निर्माण होते व प्रीतीचा प्रवाह वाहू लागतो**.

3)**प्रामाणिक विश्वास**:-

**प्रेमाचा उगम हा प्रामाणिक विश्वासातून होतो**,**त्यामध्ये कोणतेही ढोंग किंवा बहाणा नसतो**,**खोटया शिक्षकांचा ढोंगी विश्वासातून प्रिती उगम पावणार नाही**, **खरा विश्वास व प्रिती यांची सांगडचं असते**.

**आज काही ख्रिस्ती लोक फक्त दाखविण्यासाठी प्रिती दाखवितात त्यांचे अंतःकरण शुद्ध नाही**, **सुवार्तेला ती अमंगल करतात त्याचा अशुद्ध अंतःकरणातून अपराधी व दुसऱ्यांना दोषी ठरविणारा विवेक जागा होतो**, **म्हणून पौल म्हणतो**"**यास सोडून कितीएक लोक व्यर्थ बोलण्याकडे वळले आहे**" **यास सोडणे म्हणजे** "**उद्दिष्टापासून परावृत्त होने व वळले म्हणजे वाट चुकून भटकणे**"**पुढे आर्थर म्हणतात** '**प्रीतीचे वातावरण निर्माण करने हे या खोट्या शिक्षकांचे ध्येय कधीच नव्हते**'**त्यांना त्याची अहंकाराची पूर्ती करावयाची होती**.

**जॉर्ज लिडेल म्हणतात**-- **देवाच्या व्यक्ती कसा असतो यांचे वर्णन करतांना लिहितो**.

"**देवाचा एक मनुष्य मला द्या**:

"**देवाचा एक मनुष्य मला द्या**.**एक मनुष्य**
**त्यांच्या मनावर त्यांच्या विश्वासाचे वर्चस्व असेल तर सर्व चुका मी सुधरवींन**,**आणि सर्व मनुष्यजातीच्या नावाला आशीर्वाद देईन**.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**"देवाचा एक मनुष्य मला द्या,एक मनुष्य**

**ज्याच्या जिभेला अग्निने स्पर्श केला आहे, आणि सर्व काळोख्या अंत:करणांमध्ये मी ज्योत पेटवीन,उच्च निर्णयाने व शुद्ध इच्छेने.**

**"देवाचा एक मनुष्य मला द्या.एक मनुष्य**

**जो प्रभूचा थोर संदेष्टया असेल,आणि मी तुम्हाला पृथ्वीवर शांती देईन,प्रार्थनेने विकत घेतलेली,तलवारीने नव्हे**

**"देवाचा एक मनुष्य मला द्या,एक मनुष्य**

**जो त्याने पाहिलेल्या दर्शनाशी एकनिष्ठ असेल,आणि तुमची भग्न मंदिरे मी पुनः बांधीन,**

**आणि सर्व राष्ट्रांना त्यांच्या घुडघ्यावर नमवीन."**

**६) नम्र पाळक देवाचा खरा राजयोद्धा आहे:-**

**जॉन बनियन म्हणतात "ऐहिक ध्येयांच्या पुढे जाऊन,देवाचे वचन घोषित करण्याच्या सेवेत जे पूर्ण निष्ठावान राहिले आहेत ते *राजयोद्धे* आहे".बायबल मध्ये फक्त दोनच पाळकाना पाऊल विश्वासपुत्र म्हणून घोषित करतो _तिमुथी_ आणि _तितस_ ,कारण हे दोघी पाळक देवाचे देवभक्त म्हणून संबोधले गेले,खोट्या शिक्षणाविरुद्ध लढणारे आणि देवाची पूर्णवाणी ऐकणारे राजयोद्धे म्हणून यांची ख्याती होती,असा पाळक देवाला नेहमी सत्याचे बलिदान अर्पण करीत असतो.धन्य आहे ते पाळक जे नम्रतेचे वस्त्र परिधान करतात देव त्यांना प्रेम करतो.पाऊल सांगतो नीतिमत्व आणि सुभक्ती हे दोन जुडे गुण प्रत्येक पाळकांनमध्ये असायला हवे,नीतिमान पाळकांचा सामर्थ्याकरिता व उपयुक्ततेकरिता हे दोन सद्गुण महत्वपूर्ण आहे म्हणून चार्ल्स स्पर्जन या दोन गुणांना *"पाळकांचे स्व-रक्षक"* असा शब्दात वर्णन करतात."असे पाळक देवाचे पवित्र राजयोद्धे म्हणून मंडळीत सर्वांचे प्रिय बनतात ."_**

**जॉन बनियन असा पाळकांची प्रशंसा करून असे म्हणतो की "जो खाली आहे,त्याला पडण्याचे भयं नाही,जो नम्र आहे,त्याला गर्व ठाऊक नाही,जो सौम्य आहे,त्याला सर्वदा देव मार्गदर्शन करतो."*जो**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**पाळक खाली आहे तो भरण्यासाठी खटपट करीत नाही,जो पाळक नम्र आहे त्याला लोकांसमोर थाळी वाजवायची गरज नाही,जो पाळक सौम्य आहे देव त्याला पवित्र आत्म्याद्वारे आणि पवित्र वचनाद्वारे नेहमी मार्गदर्शन करीत असतो,**

**आज प्रत्येक मंडळीला तिमुथी आणि तितस सारख्या विश्वासपुत्रांची गरज आहे,ज्याचा आदर्श ख्रिस्ती लोकापलीकडे म्हणजे अन्यजातीतही असायला हवा, सर्व लोकांनी ही साक्ष द्यायला हवी,बघा हा ख्रिस्ती पाळक देवभक्त असा आहे,बघा हा ख्रिस्ती पाळक विश्वासुपुत्र आहे.असा पाळक देवाचा मंडळींसाठी खूपच मूल्यवान आहे, ज्याच्या पवित्र उपदेशाने विश्वासी लोकांचे भले होते, विश्वासी लोकांनी असा पाळकांची काळजी करायला हवी,त्याच्या अधिनतेत जगायला हवे,एलिशाने आत्म्याच्या दोन पट अंश एलीयाह कडून मागितला आणि प्राप्त केला,त्या प्रमाणे असा पाळक तुमच्या मंडळीत असेल तर प्रत्येक विश्वासीने त्या पाळका कडून देवाच्या पवित्र राजयोद्धाचे दोन अंश प्राप्त करून घ्या असे आव्हान मी करतो, कारण हे नम्र पाळक आहे,ते खरे देवाचे राजयोद्धे आहे."**

**७) खरे ख्रिस्ती शिष्यत्व आणि मी:-**

**"ख्रिस्ती शिष्यत्व हे प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसाठी आहे ज्याचे देवाचा उद्देशाप्रती पूर्ण समर्पण आहे, एच ए इव्हन हॉपकिन्स लिहितात _"त्याच्या पावलांवरून ध्येयहीनपणे वाहवत जाणाऱ्या समुदायाला तो शोधत नाही,परंतु प्रभू येशूने स्वतःला तुडविलेल्या स्वनाकाराच्या मार्गावरून जाण्यास तयार असलेले लोक त्याला हवे आहेत हे ज्यांना समजले आणि त्यामुळे ज्याच्यात ज्वलंत निष्ठेचा उगम होईल अशा स्त्री-पुरुषांना तो नेहमी प्रमाणेच आजही शोधत आहे."देव अशा शिष्याना शोधत आहे जे देवाचा उद्देशाला कवटाळून आणि स्वनाकाराचा मुखवटा बाजूला सारून त्याचा राज्यात चालण्याचा प्रयत्न करतात.**

**सी-ए-कोअटस च्या भाषेत"जगाच्या रहिवाटीनुसार हा मार्ग अनादराचा व निर्भत्सनेचा आहे"_ आपली इच्छा त्यागून जो देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपले जीवन नदीच्या प्रवाहप्रमाणे वाहवत असतो तो खरा शिष्य होय, *एच जी सी मोल* सांगतात त्याप्रमाणे "वैभवी विजयी पवित्र राजा माझ्या,हातात**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**तुझ्या गुंफवी ह्या समर्पित होता,माझी इच्छा आता पूर्ण तुझीच,तारकांच्या राजासनाचा आनंदी असे हा दास"जो शिष्य देवाला आपली इच्छा समर्पित करून देतो तो देवाचा राजासनासमोर अनंतकाळासाठी आनंदोत्सव साजरा करेल,ख्रिस्ताला असे लोक हवे आहेत की जे त्याच्या मागे सतत जातील व निर्विवाद आज्ञापालन करतील. पुन्हा एच-जी-सी-मोल चे शब्द महत्वपूर्ण आहे "मालका माझ्या,दाराकडे ने मला तुझ्या इच्छित हे कान,टोच पुन्हा एकवार, बंधने तुझीच,असे स्वातंत्र्य हेच तुजसह सदैव राहू दे मला परिश्रम,सहन,आज्ञापालन करण्याला"_ स्वातंत्र्य म्हणजे मानसिक आणि शारीरिक गुलामी होय,मला देवाचा उद्देशासाठी स्वतंत्र केले गेलेले आहे याची जाणीव प्रत्येक ख्रिस्ती शिष्याला असायला हवी,हीच जाणीव मला देवाचा राज्यात चालण्यासाठी मदत करते. अंतिमतः विलियम मैक्डोनाल्ड ख्रिस्ती शिष्यत्वा पासून मी मागे नाही फिरावे म्हणून एक पश्चतापी प्रार्थना करतात जी आपल्याना देखील लागू होते."मला मागे फिरण्यापासून वाचवं,माझ्या नांगराची मूठ अश्रूनी चिंब झालीय,ती गंजून झालीय आणि तरीही माझ्या देवा,माझ्या देवा,मला मागे फिरण्यापासून वाचव."**

**८) लोकांना नव्हें तर देवाला संतुष्ट करण्यासाठी उपदेश करा:-**

**'पवित्रशास्त्र आपल्याला आवश्यक आहे.आम्हांला दृष्टांताची गरज नाही,आंम्हाला *नवीन प्रकटीकरणाची गरज नाही,आम्हांला स्वर्गातून वाणी ऐकण्याची गरज नाही,जे शास्त्र उतारे आम्हांला देऊ केले आहेत.ते परिपूर्ण आहेत.''-जॉन मॅकआर्थर-**

**स्टीव्हन ए क्रॅलोप "लोक आपल्याविषयी काय म्हणतात याविषयी जेव्हा आपण चिंता करतो तेव्हाच जमावसपुढे बोलण्याचे भयं वाडु लागते.बायबल उलगडा करणाऱ्या उपदेशकावर नक्कीच टीका होणार कारण देवाचे वचन पापाची खात्री करून देते आणि पापाचा निषेध करते.देवाच्या वतीने बोलणारे या नात्याने माणसाकडून नव्हें तर देवाकडून मान्यता मिळावी म्हणून संदेश देण्याद्वारे आपण मनुष्याविषयीच्या भयावर मात केली पाहिजे प्रेषित पौल लिहितो की "मी आता मनुष्याची अगर देवाची मनधरणी करावयास पाहतो काय?मी मनुष्यास संतुष्ट करावयास पाहतो का?मी अजून मनुष्यास संतुष्ट करावयास पाहिले असते तर मी ख्रिस्ताचा दास नसतो(**गलाती 1:10)**प्रत्येक संदेश प्रभूला आपण**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**आपली भक्ती व आराधना म्हणून अर्पण करायला हवा.असे करण्याने आपल्या संदेशावर लोक जी मते मांडतील आणि प्रतिक्रिया व्यक्त करतील त्याच्या बंधनातून आपण मुक्त असू.आज काही पाळक मंडळीला संतुष्ट करण्यात गुंग आहे,विश्वासी लोक स्वतःला दुसऱ्या विश्वासीपेक्षा श्रेष्ठ मी कसा आहे याची संतुष्टी करण्यात व्यस्त आहे,काही पाळक देवाचा संदेश फक्त लोकांना खुश करण्यासाठी देत आहे,संतुष्टी ही फक्त पाळक आणि मंडळीतील विश्वासी लोकांसाठी आहे देवाचा पाळक आणि मंडळींशी काहीही संबधं राहिला नाही**."

**९) ख्रिस्ताचे जीवन जगणे पवित्रशास्त्र वचनाचे पालन केल्याने होते** :-

''**पण त्यापेक्षा जे देवाचे वचन ऐकतात व पाळतात ते धन्य**!" (**लूक ११**:**२८**)**देवाच्या वचनाचे पालन होणे**.**तसेच ते ऐकले जाणे आवश्यक आहे**.**आपण ते निष्काळजीपणाने ऐकू नये**. **आणी न**! **केवळ ऐकणारे आणि ऐकल्यानंतर त्याला तत्काळ विसरणारे होऊ नये**. **आपल्या अंतःकरणात त्याला मौल्यवान मालमत्ता म्हणून जतन व रक्षण केले पाहिजे**. **जेव्हा आपण त्यावर विश्वास ठेवू आणि त्याला अनूसरू**,**तेव्हा सर्व आशीर्वाद आपले होतील**.

**जे देवाचे वचन ऐकतात व पाळतात ते धन्य का आहेत**?

**१**. **कारण देवाचे वचन आपल्याला तारणाऱ्याविषयी सांगते**, **क्षमा आणि शांती यांविषयी बोलते**, **आणि पाप्यांना तारण्याचा देवाचा अदभूत मार्ग आपणासाठी उघडते**. **हे इतर कोणतेही पुस्तक किंवा इतर कोणीही सांगू शकत नाही**. **निसर्गात असलेले देवाचे कार्य आपल्याला बरेच काही सांगते**. **परंतु ते आपल्याला वरील गोष्टी सांगत नाही**. **या विषयावर मनुष्यांनी बरेच पुस्तके लिहिलेली आहेत**.**असे असले तरी ती शेवटी मनुष्यांची पूस्तके आहेत**.

**२**. **ते यामुळे देखील आशीर्वादित आहेत**, **कारण देवाचे वचन एक निश्चित मार्गदर्शक आहे**. **या जगाच्या अरण्यातून जाण्याचा हा एक कठीण मार्ग आहे**.**आपल्याला बरेच अडथळे येतील आणि आपण गोंधळून जाऊ आपल्यासमोर मार्गदशनासाठी वेगवेगळे नियम**: **जसे पद्धती**, **रूढी**, **शहाणपण**, **मनुष्याचे मत**, **इत्यादी ठेवले जातील**. **परंतु देवाचे वचनच एकमात्र निश्चित मार्गदर्शक आहे**. **या मार्गदर्शनाचे साधे**,

**विनम्र आणि एकाग्रतेने केलेले अनूकरण अति शहाणपणाचा,आनंददायक, सुरक्षित अभ्यासक्रम आहे! सर्वात गरीब आणि सर्वात अशिक्षीत जो कृपेच्याद्वारे हे शिक्षण घेतो तो अति महान आणि हुशार असे लोक जे इतर मार्गाचे अनुकरण करत आहे त्यांच्यापेक्षा अधिक योग्य मार्गक्रमण करण्यासाठी सुरक्षीत आहे. म्हणूनच ते धन्य आहेत.कारण त्यांच्याकडे एक उत्तम मार्गदर्शक आहे.**

**३. देवाचे वचन संकटात सांत्वन देते,आणि म्हणूनच ते धन्य आहेत. या जगामध्ये दुःख व अडचणी देखील आहेत, दुःख अनेक व मोठी आहेत; परंतु देवाच्या वचनाजवळ जीवनातील सर्व दुःखांसाठी सांत्वन आहे. ते पूर्ण सांत्वनाने भरलेले आहे. त्यात देवाच्या प्रितीची घोषणा आणि अभिवचने आहेत. त्यात शोक करणाऱ्या व्यक्तींचे उदाहरणे आहेत, ज्यांना त्याने सांत्वन दिले आणि ते मोठ्या संख्येत आणि विविध प्रकारात आहेत.असे कोणतेही दुःख नाही ज्यासाठी योग्य ते सांत्वन पवित्र-शास्त्रात दिलेले नाही. खोल दुःखाच्या काळात देवाच्या वचनात दिलासा आणि सांत्वन आढळते जे इतर कुठल्याही पुस्तकात आढळत नाही. जे संकटात आहेत अशांसाठी हे पुस्तक सर्व पूस्तकांमध्ये सर्वोत्तम आहे."**

**१०) तुमचे शब्द ख्रिस्ताला प्रकट करितातः-**

**"देवाचे स्वर्गीय वचन त्याच्या शब्दांनी प्रकट झालें असून ते तारणाचे सामर्थ्य किंवा ते तारणाचे साधन नसून,ते तारणाचा मध्यस्थ असे आहे."**

**शब्द आत्म्याने प्रेरित होतो पाळकांचा शब्दफेकाने नाही.जॉन मैकआर्थर म्हणतत "पवित्र शास्त्र हे मानवाच्या,अगदी धार्मिक साधुसंतांच्या देखील बुद्धीमत्तेचे व अंतर्ज्ञानाचे भांडार नव्हें.ते देवाचे सत्य,देवाच्याच शब्दात,त्याचेच वचन आहे,स्रोतकर्त्याने म्हटले"हे परमेश्वरा तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे(स्रोत** 119:89)**,पृथ्वीवरील माणसांना देवाचे वचन,दैवी संकेतानुसार प्रकट होऊन ते स्वर्गात दैवी इच्छेने अधिकृत करण्यात आले आहे म्हणून पेत्र सांगतो"हे प्रथम मनात आणावयाचे की शास्त्रातील कोणत्याही संदेशाचा स्वतःच्या कल्पनेने उलघडा होतं नाही"कारण संदेश मनुष्याच्या**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**इच्छेने कधी झालेला नाही;तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यानी देवापासून तो सांगितलेला आहे**."(2**पेत्र** 1:20-21)

**वचन स्पष्ट सांगते संदेश कधीच मनुष्याच्या इच्छेने प्रगट होतं नाही,पण आज जर मंडळीतील संदेश पाहिला तर ती फक्त पाळकांची शब्दफेक असते,त्याला पवित्र आत्म्याची प्रेरणा अथवा जोड नसते म्हणजे तो संदेश ईश्वरप्रेरित नसून स्वयं प्रेरित असतो *उदाहरणार्थ यहूदा सांगतो त्याप्रमाणे "ते अभक्त आहेत व आपल्या देवाची कृपा पालटून तिला कामातुरपणाचे स्वरूप आणतात" आज काही मंडळीत देवाच्या कृपेचा इतका गैरफायदा होतं आहे की त्याला कामातुरपणाचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते.असे ख्रिस्ती लोक अभक्त झालें.आहे म्हणून येशू सांगतो हे दृष्टीकपटी लोकांनो मी तुम्हाला ओळखत नाही.असा पाळक आणि मंडळीला देवाचे सत्य वचन कसे प्राप्त होईल.कारण संदेश दिल्यावर त्या संदेशाची पुष्टी अंमलबजावणी स्वर्गात प्रभू येशू देवासमोर मांडतो आणि देव त्या संदेशाला अंतिम मुहर लावतो,मग आज या जगात हजारो लाखो संदेश रोज दिले जातात पण ते ईश्वर प्रेरित आहे का?ते स्वर्गात मान्य होतात का?का फक्त ती शब्दफेक आहे.आज भरपूर मंडळींना आणि पाळकांना स्वतःचा संदेशाची,वचनाची,प्रार्थनेची,सुवार्तेची,व्यक्तीगत जीवनाची पूर्णचौकशी करण्याची गरज आहे,की या सर्व गोष्टीच्या माघे देवाची प्रेरणा आहे की माझी बुद्धीमत्तेची शब्दफेक आहे?का माझे जीवनच शब्दफेक आहे**?

**११)  एक ख्रिस्ती व्यक्ती दृष्टांतधारी विश्वासाने जगत असतो**:-

**१४ जानेवारी २०१९ बोधवळ,भुसावळ येथे महाराष्ट्र बायबल कॉलेजमध्ये ऐकलेला संदेश**:**कर्ट जुगर्समेयर म्हणतात ''पवित्रशास्त्रातील वचने आपण समजून घेतली व त्यावर विश्वास ठेवून ती अंमलात आणली तर आपले जीवन निश्चितच बदलून जाईल... देवासाठी तुम्हाला जे काही करावयाची इच्छा आहे ते तुम्ही निष्ठेने आणि दृढतेने करण्याचा निश्चय करा आणि त्यांची परिपूर्ती करण्याच्या**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

पाठीस लागा.तुम्ही हे करतांना देवाची कृपा आणि सामर्थ्य तुम्हच्या बरोबर आहे आणि हे करण्याद्वारे देवाचे गौरव तुम्हाद्वारे होणार आहे,आणि परिणामस्वरूप तुम्हीही त्यामध्यें गौरविले जाणार आहात.''

हा संदेश देतांना कर्टने विश्वासाची महत्वाची तत्वे सांगितली,तो म्हणतो

१) कारण देवाला तुम्हच्या फळापेक्ष तुम्हचा विश्वास अधिक मोलाचा वाटतो.

2) दुःख आणि अपयश हे दैवी गुण आहे.

3) प्रयत्न करून आलेले दुःख आणि अपयश देवाचा दृष्टीने विजयरूपी धूप आहे.

४) देव काही वेळेस आपल्याना असा जागेत पाठवितो जिथे अपयश आणि दुःख आहे.

५) ज्या विश्वासाची परीक्षा होतं नाही तो विश्वास देवाकडून नाही.

६) इतिहासकार म्हणतात नोहाचा काळात 10 अब्ज लोकसंख्या होती,तरी आठच जणांचा उद्धार झाला.

७) आज 7:50 अब्ज लोकसंख्या आहे म्हणजे नोहाचा काळापेक्षा अडीच अब्ज कमी,तर विचार करा कोणाचा उद्धार होईल.पण मनुष्याला जे अशक्य आहे,ते देवाला शक्य आहे अंतिमतः त्यांची कृपा.

८) म्हणून दृष्टांतधारी विश्वासाची फारच गरज आहे,तुम्हच्या जवळ कोणता विश्वास आहे? त्या विश्वासाची पारख होते का?तो विश्वास कोठून आलेला आहे.अशी अनेक प्रश्न आहे पण..._

तर मग उठा;दृष्टांत पाहा!त्यांची विश्वासाने परिपूर्ती करा आणि देवाचे गौरव अनुभवा.

१२) हा माझा कृपेचा वधस्तंभ आहे:-

विलियम मैकडोनाल्ड कृपेचे महत्व विशद करतांना म्हणतात "फसवे वर्तमान करा-कराचा घोषणा लावते पण कृपेचे शुभवर्तमान तुम्हाला पूर्ण झाले आहे हा दिलासा देते...प्रभू येशू ख्रिस्ताला वधस्तंभी देण्यात आले तेव्हा तर हा छळ उघडपणे करण्यात आला, ज्या तरणाऱ्याने कृपा व सत्य सर्वांसमोर सर्वांच्या उद्धाराकरिता आणले,त्यालाच मारून टाकण्याचे कट कारस्थान या कायदेपंडित शास्त्र्यांनी रचले होते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

देवाची कृपा मला ख्रिस्ताच्या वधस्तंभाकडून मिळाली आहे,ही माझी कर्माची पेटी नाही ज्याद्वारे माझा उद्धार झाला आहे,देवाची कृपा ख्रिस्ताच्या मृत्यूमध्ये वधस्तंभावरून मला मिळाली आहे,आणि हा विश्वास देवाकडून आला ज्यामुळे मी ख्रिस्तावर विश्वास ठेवला आणि मला कृपा प्राप्त झाली. हा वधस्तंभ कर्माचा नाही तर कृपेचा आहे आज भरपूर मंडळीत वधस्तंभाला कर्मकांडाकडे नेऊन देवाचा कृपेला तुच्छ जाणिले आहे,शास्त्री, फारुसि आणि सदुकी यांनी देवाच्या कृपेला तुच्छ जाणिले म्हणून त्यांनी ख्रिस्ताला नाकारले त्यांनी कर्मावर विश्वास ठेवला,आणि म्हणून ख्रिस्ताला वधस्तंभावर देऊन टाकले. ख्रिस्ती लोक आपल्या कर्मावर विश्वास ठेवून ख्रिस्ताचा वधस्तंभ उचलतात ते देवाच्या कृपेला तुच्छ जाणता,हा कृपेचा वधस्तंभ आहे आणि मी ख्रिस्तावर विश्वास ठेवितो,कारण हा विश्वास देवाकडून आलेला आहे.आणि म्हणून मी वधस्तंभावरील ख्रिस्ताच्या स्वीकार करतो कारण वधस्तंभ हा देवाच्या कृपेचा वधस्तंभ आहे कर्माचा नाही. ख्रिस्ताचा स्मरणात *जॉन केंट* चे शब्द आठवितात _"ख्रिस्ताशी चिरकालिन जडल्यावर, काहीही त्याच्यापासून तोडू शकणार नाही मजला,ख्रिस्तामध्ये मी आता सर्वदा,हाच सनातन करार सर्वकाळ लाभला,तरणाऱ्या उद्धारकासाठी दूर करण्यास,नाही कोणी समर्थ तितुका."

**१३) ख्रिस्त माझ्यात उठला आहे का:-**

**जगाच्या इतिहासातील कोणतेही पाप,दंड झाल्याशिवाय राहत नाही*.**

**ते एकतर ख्रिस्तामध्ये दंड भरून पावेल अथवा *त्याला नरकात दंड होईल.''-स्टीव्हन लॉसन-**

त्याची कबर खाली आहे,दोन हजार वर्षांपासून ती साक्ष देत आहे ख्रिस्त उठला आहे.पण तुम्ही एक ख्रिस्ती म्हणून साक्षी देता आहात का?माझा ख्रिस्त प्रभू उठला आहे,दोन हजार वर्षापूर्वीच नाही तर अनाधि अनंतकाळासाठी तो उठला आहे,आणि प्रत्येक दिवसी तो उठतो,जेव्हा मी देवाची स्तुती करितो,प्रार्थना करतो,उपदेश देतो,सुवार्ता देतो.तेव्हा माझा ख्रिस्त प्रभू उठतो. हा माझा ख्रिस्त प्रभू उठला आहे.संपूर्ण मानवजातीच्या पापक्षमेसाठी तो उठला आहे,माझ्या उद्धारासाठी तो उठला आहे,असत्य,पाप आणि सैतानावर विजय मिळवत तो उठला आहे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

हा माझा ख्रिस्त प्रभू उठला आहे,आज ज्या अज्ञानातून काही चर्चचे पुढारी आणि विश्वाशी आपल्या मंडळीतुन अंधश्रद्धा फैलावत जाता आहे,त्याच्यासाठी तो उठला आहे,वेगवेगळे पंथ-उपपंथ जे शास्त्रातून नव-नवीन संकल्पना खोटया पद्धतीने शिकवितात त्याच्यासाठी माझा ख्रिस्त प्रभू उठला आहे,ख्रिस्ताला आणि पवित्र शास्त्राला प्रथम स्थान न देता,स्वतःला मी म्हणून पुढे करण्याऱ्या काही ख्रिस्ती लोकांसाठी ख्रिस्त प्रभू उठला आहे.ख्रिस्त प्रभू दोन हजार वर्षापूर्वी माझ्या उद्धारासाठी उठला होता,पण आज तो मंडळीतील सुधारणेसाठी उठला आहे,ज्या कोणाला सुधारणा करायची आहे त्याने ख्रिस्ताकडे यावे कारण माझ्या ख्रिस्त प्रभू खरंच उठला आहे,आणि रोज माझ्या जीवनात तो उठतो त्याची अशी विशिष्ट वेळ अथवा काळ किंवा स्थान नाही,ख्रिस्त अनाधिअनंत काळासाठी जिवंत आहे,म्हणून तो उठला आहे म्हणजे तो फक्त माझ्यासाठी उठला आहे,स्वतःमध्ये तो अनंत आहे,तो आधी आणि अंत,अल्फा आणि ओमेगा,प्रथम तथा अंतिम आहे,त्याची नाही सुरुवात नाही अंत.

१४) दावीद आपल्यांना शिकवितो देव आपला दृढगड आहे:-

*पण दावीद आपला देव परमेश्वर याजवर भिस्त ठेवून खंबीर राहिला.१ शमु. ३०:६.

प्रभूवर भरंवसा ठेवून त्याचे ऐकतात, त्यांना तो सदोदित सामर्थ्य पुरवतो. त्याला कधीच उणे पडत नाही. विश्वासणाऱ्याने आपला गतकाळ आठवून पाहावा. संकटे सोसण्यासाठी, प्रश्न सोडविण्यासाठी तो नेहमीच शक्ती देतो असे अनेक उदाहरणांवरून दिसून येईल.प्रत्येकाला त्याच्या त्याच्या गरजेप्रमाणे अशी शक्ती मिळते. एका महिलेच्या पायावर शस्त्रक्रिया करून तो कायमचा कापावा लागणार होता. ती अतिशय दुःखी झाली. मी पवित्र शास्त्रामधून एक उतारा तिच्यासमोर वाचला; प्रभूच्या प्रीतीची खातरजमा करून दिली आणि तो शक्ती देईल याची हमी दिली. आम्ही एकत्र प्रार्थना केली. प्रभुने तिला शक्ती दिली. ती शांत वृत्तीने न घाबरता शस्त्रक्रियेसाठी गेली. काही दिवसांनी ती घरी परतली. आता ती पूर्वीपेक्षा अधिक चांगली, प्रेमळ, ख्रिस्तासारखी बनली आहे.दावीद आणि त्याचे सैनिक मोहिमेवरून परत आले.अमालेकी लोकांनी त्यांची घरेदारे जाळून टाकली आहेत, साऱ्यांचा कुटुंबकबिला धरून नेला असे त्यांना आढळले. हे पाहताच प्रथम ते दुःखाने आक्रोश करू लागले. लवकरच दुःखाची जागा क्रोधाने

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

घेतली. दाविदाचे सैनिक त्यालाच दोष देऊ लागले. याला दगड मारा, ठेचा ! असे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली, पण दाविद "आपला देव परमेश्वर याच्यावर भिस्त ठेवून खंबीर राहिला," म्हणजेच त्याने देवाची करुणा भाकली, गतकाली देवाने केलेली कृपा आठवली आणि भविष्यकाळातील अभिवचनांचे स्मरण केले. परिणामी त्याला प्रभूपासून सामर्थ्य मिळाले.जेंव्हा केंव्हा तुमच्यावरही असा बिकट प्रसंग येईल, तेंव्हा प्रभूमध्ये खंबीर व्हा. त्याच्या कृपेची आठवण करा. त्याची अभिवचने आठवा. कळकळीने प्रार्थना करा. देव तुमचे बलस्थान होईल.आमच्यावर संकटे अगदी कोसळण्याच्या बेतात असतात, तेंव्हा देव आम्हांला खंबीर करण्यास सज्ज असतो.

**१५) ख्रिस्त मला शरीरात मरायला आणि आत्म्यात जगायला शिकवितो:-**

जॉन ओवेन आपल्यांना सांगतो "कोण त्याच्यावर प्रेम करणार नाही? दिन आत्मा म्हणेन 'मी प्रभु येशूबरोबर आहे"तो म्हणतो:'मी माझ्या पापांना, माझ्या ओझ्याला, त्याच्यावर टाकले आहे; आणि त्याने मला त्याचे 'नीतिमत्त्व' प्रदान केले.त्याच्या साहाय्यामूळे मी देवासमोर धैर्याने जात आहे. मी मृत होतो, आता जिवंत आहे; कारण तो माझ्यासाठी मरण पावला.मी शापीत होतो, आता आशीर्वादित झालो. कारण तो माझ्याकरिता शाप झाला.मी खूप निराश होतो, आता मला शांती लाभली आहे. कारण माझ्या शांतीसाठी त्याच्यावर शिक्षा लादली.काय करावं हे मला ठाऊक नव्हतं, किंवा माझे दुःख कूठे न्यावे हे मला कळत नव्हते; पण त्याच्या द्वारे मला अवर्णनीय आणि तेजस्वी आनंद लाभला.जर मी त्याच्यावर प्रेम करत नाही, त्याच्याठायी सुखावत नाही, त्याच्या आज्ञा पाळत नाही, त्याच्यासाठी जगत नाही, त्याच्यासाठी मरत नाही, तर मी नरकातील दुष्ट आत्म्यांपेक्षा अधिक वाईट आहे.आत्मिक फळे माझ्या जीवनात वाहतात"आम्हांला माहित आहे की, प्रभु येशू व्यतिरिक्त आम्हीं पवित्र होऊ शकत नाही. पण त्याच्याबरोबर जोडले गेल्या कारणाने आम्हीं जग, देह, आणि सैतान यावर विजय मिळवीत असतो आणि डाग नसलेल्या वस्त्रासह (जी जगाकडून नाहीत) चालतो. आत्म्याचे फळ प्रीति,आनंद,शांति, सहनशीलता, सौम्यता, चांगुलपणा, विश्वास, सौम्यता, आत्मसंयमन, आणि सर्व प्रकारचे पवित्र संभाषण आहे. या पैकी कोणतीही गोष्ट आपल्या स्वतः मध्ये समान नाही; तरीही आपण

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**विश्वासामुळे पौलाबरोबर म्हणतो,"मला जो सामर्थ्य देतो त्या ख्रिस्ताकडून मी सर्वकाही करण्यास शक्तिमान आहे.''(चार्ल्स स्पर्जन)**

**म्हणून जॉर्ज गिलेस्पी म्हणतात माझी सर्व धार्मिकता काय तर ती घाणेरेडी/कुजट चिंधी आहे?मी जे सर्व काही केले; ते त्याच्या न्यायाच्या मापदंडा खाली टिकू शकत नाही. जेव्हां ते माझा देव आणि माझ्यामध्ये मोजले जाईल; तेव्हां ते सर्व घृणास्पद आणि अशुद्ध गोष्टी प्रमाणे ठरतील. ख्रिस्त हाच सर्व काही आहे,आणि मी काहीच नाही!"**

**१६) ख्रिस्ताची प्रीती ख्रिस्ती म्हणून तुमच्यात प्रवाहित होत आहे का:-**

**सि. एच. स्पर्जन म्हणतो त्याच्या निवडलेल्यांसाठी देवाची प्रीती न बदलणारी आहे."जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली तशी मीही तुमच्यावर प्रीती केली आहे."जसा पिता पुत्रावर प्रीती करतो, तसाच येशू त्याच्या लोकांवर प्रीती करतो. ती दैवी पद्धत काय आहे? त्याने प्रारंभा पूर्वी त्याच्यावर प्रीती केली आणि अशाच प्रकारे येशू त्याच्या शरीरावर (लोकांवर) प्रीती करतो. "मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो." तुम्ही मानवी प्रेमाची सुरूवात शोधू शकता;तुम्ही सहज ख्रिस्तावरील तुमच्या प्रेमाची सुरवात शोधू शकता, परंतु त्याचे आपल्यावरील प्रेम म्हणजे एक प्रवाह आहे - ज्याचा स्रोत सार्वकालिकतेमध्ये दडलेला आहे. देव पिता येशूवर न बदलणारी प्रीती करतो. ख्रिस्ती जनहो, हेच तुमच्यासाठी सांत्वन आहे की, जे येशू ख्रिस्तामध्ये स्थिरावलेले आहेत त्यांच्यासाठीही ख्रिस्ताची प्रीती ही न बदलणारी आहे. काल तूम्ही ताबोर डोंगराच्या शिखरावर होता आणि तूम्ही म्हणाला, "तो माझ्यावर प्रीती करतो." आज तुम्ही मानहानीच्या दरीत असला, तरीही तो तुमच्यावर तशीच प्रीती करतो. तुम्ही हर्मोनाच्या प्रदेशात व मिस्हाराच्या डोंगराजवळ असता त्याचा आवाज ऐकला. जो खूपच मधुर आणि गोड होता; आणि आता तुम्ही समुद्रावर किंवा समुद्रामध्ये आहात, जेव्हा त्या समुद्राच्या सर्व लाटा तुमच्यावरून जातात, तेव्हा देखील तो त्याच्या पूर्वीच्या निवडीविषयी विश्वासू आहे. पिता पुत्रावर कूठल्याही शेवटाविना प्रीती करतो आणि या रीतीने पुत्र देखील त्याच्या लोकांवर प्रीती करतो. हे विश्वासणाऱ्या, तुला चांदीचा दोर गमावण्याविषयीची भिती वाटू नये, कारण तुझ्यावरील त्याच्या**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रीतीचा कधीही शेवट होणार नाही. म्हणून निसंदेह राहा, कारण कबरेच्या खाली देखील ख्रिस्त तुझ्याबरोबर जाईल, आणि त्यातून पुन्हा तो तुला स्वर्गीय टेकडी करता मार्गदर्शक होईल. आणखी, जसा पिता कोणत्याही मोजमापावीणा पुत्रावर प्रीती करतो, तसाच पुत्र देखील त्याच्या निवडलेल्यांवर अफाट प्रीती करतो. ख्रिस्ताचे संपूर्ण हृदय त्याच्या लोकांकरीता समर्पित आहे. त्याने "आम्हांवर प्रीती केली आणि स्वतःला आपल्याकरता अर्पण व यज्ञ म्हणून दिले." त्याचे प्रेम बुद्धीसामर्थ्या पलीकडचे आहे.आह! आपल्याकडे खरोखरच एक अपरिवर्तनीय, मौल्यवान तारणारा आहे, ज्याची प्रीती अमाप, न बदलणारी, आदी व अंत नसलेली आहे, अगदी तशीच जसा पिता त्याच्या पुत्रावर प्रीती करतो! पचवण्यासाठी येथे भरपूर अन्न आहे. पवित्र आत्मा करो की, आपल्याला त्या प्रीती रुपी अन्नाच्या सत्वाकडे आणि भरपूरतेकडे घेऊन जावो!**

**संदर्भग्रंथसुची:-**

*जिवंत देवाची मंडळी, र.सु. मिरजकर, उन्नती प्रकाशन, प्रथमावृत्ती २०११, बेळगाव*
*तुमच्या भविष्यकाळाचा विचार करा, विलियम मैक्डोनाल्ड, ओथेन्तिक प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१४, सिकंदराबाद*
*हमारी प्रतिदिन कि रोटी, झोनडरवन प्रकाशन, २००९, ISBN-९७८-१-६२७०७-७२७-९*
*आध्य ख्रिस्ती मंडळीचा इतिहास, बथूवेल गावित, जीवनोदय प्रकाशन, प्रथमावृत्ती २००७, नवापुर*
*मी माझा देश.. माझी मंडळी, रेव्ह सुभास डोंगरदिवे, महान प्रीती प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१०, पुणे*
*एकदा तारलात कि कायमचा बदललात, स्टीव्ह फर्नांडिस, लव्ह महाराष्ट्र, प्रथमावृत्ती २०१५, पुणे*
*एक अगुवा के निर्माण कार्य मे, पौल मार्श मल्खानी, ओथेन्तिक प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१३, सिकंदराबाद*
*अपनी बायबल का आनंद उठाइये, आर्थर फारस्तॆड-विलियम मैडोनाल्ड, जी एस एल प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१५, सिकंदराबाद*
*वैदिक शोधयात्रेची परिपूर्ती प्रभू येशू ख्रिस्त, आचार्य दयाप्रकाशजी, जीवनवचन प्रकाशन, प्रथमावृत्ती १९९०, पुणे*
*पवित्र बायबल, पहिले शमुएल, अध्याय-३०-वचन-६*
*पवित्र बायबल, स्तोत्रसहिता, अध्याय-५१-वचन-१०*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*